# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७ /( ३२२/ ०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) चा कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सत्र २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(विद्या विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली-४४२६०५ फोन नंबर ०७१३२ - २२३३२३

गोंविग/ विद्या /क्र/ ८०२ /२०२४

## // परिपत्रक //

दिनांक ०१/३ /२०२४

प्रति,

**प्राचार्य, सलग्नीत सर्व महाविद्यालये,**
**विभाग प्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

**विषय:- पदवि व पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता -मतदार मित्र आंतरवासीता (ईंटर्नशिप) उपक्रम व त्याअंतर्गत विद्यार्थ्यांच्या निकडीचे निकष, अटी, शर्ती, आणि अंमलबजावणीबाबत.**

**संदर्भ:- १.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण-२०२२/प्र.क्र.७६६/२२/३३, दिनांक- ०६ फेब्रुवारी,२०२४**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये व विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागांना कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ नुसार दिनांक ०६/०२/२०२३ शासन निर्णयान्वये, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) -२०२० च्या अमलबजावणीमध्ये शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये आंतरवासीता ( इंटर्नशिप) हा महत्वाचा भाग असून पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये आंतरवासीता ( इंटरर्नशिप) लागू करण्यात आली आहे. आंतरवासिता ( इंटरर्नशिप) ही विद्यार्थ्यांना स्वत:मध्ये व्यावहारीक कौशल्ये विकसीत करुन शासकिय यंत्रणेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळविण्याची संधी आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे समूह काम, लोकांमध्ये जाऊन काम करणे, शासकीय कामतील समस्या, अडचणी आणि त्या सोडण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना यांची विद्यार्थ्यांना माहिती मिळणार आहे. सदर शासन निर्णय अधिनस्त सर्व महाविद्यालये तसेच पदव्युततर शैक्षणिक विभागामार्फत पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावा.

अहवाल दिनांक १२/०३/२०२४ पर्यंत democracybook२०२२@gmail.com वर पाठवावा व Copy to nssdsw.gug@gmail.com व director.dsd@unigug.ac.in करावे.

करीता सलंग्नीत सर्व महाविद्यालये व विद्यापीठातील पदव्युत्तर शैक्षणिक विभागांनी वरील शासननिर्णय यांचे सुचनाचे अवलोकन करावे.

**सहपत्र :- वरील प्रमाणे**

(डॉ. अनिल हिरेखण )
कुलसचिव
गोंडवाना विद्यापिठ गडचिरोली

**प्रतिलिपी :** १) मा. कुलगुरु, यांचे स्विय सहाय्यक गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर
२) मा. प्र-कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मा. वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.

पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरिता- मतदार मित्र आंतरवासिता (इंटर्नशिप) उपक्रम व त्यांतर्गत विद्यार्थ्यांच्या निवडीचे निकष, अटी, शर्ती आणि अंमलबजावणीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण-२०२२/प्र.क्र.७६६/२२/३३,**
६ वा मजला, मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक - ०६ फेब्रुवारी, २०२४

**प्रस्तावना :-**

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र हे भारत निवडणूक आयोगांतर्गत कारर्यत असलेले कार्यालय आहे. मतदार नोंदणी करणे आणि विधानसभा, लोकसभा आणि विधानपरिषदेच्या निवडणुका घेणे हे या कार्यालयाचे मुख्य कार्य आहे. तसेच या कार्यालयामार्फत -मतदारांचे पद्धतीशीर शिक्षण आणि निवडणुकीतील सहभाग (Systemetic Voters॰ Education & Electoral Participation - SVEEP) हा मतदार जागृतीचा कार्यक्रम राबवला जातो.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० च्या अंमलबजावणीमध्ये शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये आंतरवासिता (इंटर्नशिप) हा महत्त्वाचा भाग असून पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये आंतरवासिता (इंटर्नशिप) लागू करण्यात आली आहे. आंतरवासिता (इंटर्नशिप) ही विद्यार्थ्यांना स्वतःमध्ये व्यावहारिक कौशल्ये विकसित करून शासकीय यंत्रणेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळविण्याची संधी आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे समूह काम, लोकांमध्ये जाऊन काम करणे, शासकीय कामातील समस्या, अडचणी आणि त्या सोडवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना यांची विद्यार्थ्यांना माहिती मिळते.

आंतरवासित (इंटर्न) मतदार जागृतीचे उपक्रम राबविण्यासाठी नवनवीन कल्पना व दृष्टिकोन आणू शकतात, त्यामुळे लोक नैतिक व माहितीपूर्ण पद्धतीने मताधिकार बजावण्यास प्रोत्साहित होऊ शकतात. लोकजागृतीच्या या विविध उपक्रमांचे व्यवस्थापन आणि अंमलबजावणी करण्याच्या कार्यात आंतरवासित (इंटर्न) सहभागी करून घेण्यासाठी हे आंतरवासिता धोरण मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून राबविण्यात बाब विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.